# प्रेस नोट

ला.प्र.वि,वाशिम.

दि.११/०४/२०२३

आरोपी लोकसेवक क. १)मोहन शेषराव तिडके वय- ५० वर्षे, व्यवसाय- नोकरी, वरीष्ठ लिपीक, तहसिल कार्यालय मानोरा,जि.वाशिम रा. महसुल कॉलणी कारंजा ता.कारंजा जि.वाशिम यांच्या करीता आरोपी कं. २) जगदिश पृथ्वीराज चव्हाण वय- ३१ वर्षे, व्यवसाय- संगणक ऑपरेटर, तहसिल कार्यालय मानोरा, रा. शिवणी ता.मानोरा जि.वाशिम लाच रक्कम ३०,००० रुपयाचा स्विकार करुन व ३) दिलीप तुळशिराम मनवर, वय-५८ वर्षे व्यवसाय- मजुरी रा.हिरवा बु. ता.मानोरा जि. वाशिम याने तक्रारदार श्री ज्योतीलाल राठोड यांना लाच देण्यास प्रोत्साहन दिल्याने आरोपीतांविरुध्द गुन्हया दाखल करुन त्यांना ताब्यात घेवुन अटक करण्यात आली आहे.

| | |
|---|---|
| आरोपी नांव हुद्दा व पत्ता | १)आरोपी लोकसेवक मोहन शेषराव तिडके वय- ५० वर्षे, व्यवसाय- नोकरी, वरीष्ठ लिपीक, तहसिल कार्यालय मानोरा,जि.वाशिम रा. महसुल कॉलणी कारंजा ता.कारंजा जि. वाशिम,<br>२) जगदिश पृथ्वीराज चव्हाण वय- ३१ वर्षे, व्यवसाय- संगणक ऑपरेटर, तहसिल कार्यालय मानोरा, रा. शिवणी ता.मानोरा जि.वाशिम<br>३) दिलीप तुळशिराम मनवर, वय-५८ वर्षे व्यवसाय- मजुरी रा.हिरवा बु. ता.मानोरा जि. वाशिम |
| लाच स्विकारल्याची रक्कम | ३०,०००/- रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांचे नावने असलेल्या शेतीचे अकृषक करुन दाखला देण्याकरीता ३०,००० रुपये लाचेची मागणी करुन स्विकारले आहे. |
| सापळा अधिकारी | श्री महेश भोसले, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वाशिम. |

दि.१०/०४/२०२३ रोजी तक्रारदार पुरुष वय २९ वर्ष यांनी तक्रार दिली की, तक्रारदार यांच्या नावे असलेलेल्या वडिलोपार्जीत शेतीचे अकृषक काम करुन दाखला देणेकरीता दि.१०/०४/२०२३ रोजी ३०,०००/- रुपयाची पडताळणी दरम्यान लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. दि.१०/०४/२०२३ रोजी सापळा कारवाई दरम्यान आलोसे यांच्या वतीने कंत्राटी जगदिश चव्हाण,संगणक ऑपरेटर यांनी ३०,०००/- रुपये स्विकारले तसेच आरोपी क.३ दिलीप मनवर रा.हिवरा बु. यांने आलोसे यास लाच देण्याकरीता तक्रारदारास प्रोत्साहन दिल्याने ला.प्र.वि. पथकाने आरोपी क.०२ जगदिश चव्हाण यांचे कडुन लाच रक्कम रुपये ३०,०००/- हस्तगत केली. वरील तिनही आरोपीतांविरुध्द सदर प्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनीयम १९८८ चे कलम ७,१२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदर कार्यवाही मा.पोलीस अधिक्षक,श्री विशाल गायकवाड, अपर पोलीस अधिक्षक श्री अरुण सावंत, ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती, यांचे मार्गदर्शनात व पर्यवेक्षण अधिकारी पोलीस उप अधिक्षक श्री गजानन आर शेळके,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वाशिम यांचे सह तपास अधिकारी पोलीस निरीक्षक श्री महेश भोसले यांचे पथकातील कर्मचारी पोहवा नितीन टवलारकर, विनोद अवघडे, विनोद मारकंडे दुर्गादास जाधव, पोना योगेश खोटे, रवि घरत व चापोशि शेख नावेद यांनी केली.

शासकिय लोकसेवकान,खाजगी इसमाने शासकिय काम करुन देण्यासाठी व करण्यासाठी लाचेची मागणी केल्यास त्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो,वाशिम दुरध्वनी कमांक ०७२५२/२३५९३३ टोल फ्रि.नं.१०६४ मोबाईल कमांक - ९०२८२००४४४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन महेश भोसले पोलीस निरीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो,वाशिम यांनी केले आहे.

MBhosale P.I

(महेश भोसले)

पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.,वाशिम.

(एम.के भोसले)

पोलीस निरीक्षक

ला.प्र.वि वाशिम